I J R S S I S, Vol. VIII, Issue (3), May-2022 : 206-211
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# स्वयंसहाय्यता बचत गटाद्वारे महिलांचे सामाजिक व आर्थिक सबलीकरण

डॉ. नरेंद्र के. पाटील

अर्थशास्त्र विभाग प्रमुख
आनंद निकेतन महाविद्यालय, आनंदवन, वरोरा
Corresponding Author : narendra.anandwan@gmail.com

Communicated : 01.04.2022 | Revision : 07.04.2022 Accepted : 12.04.2022 | Published : 02.05.2022

**सारांश :**

कोणतेही राष्ट्रातील दारिद्रेषेखाली असणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी होणे हे त्या राष्ट्रात शांतता प्रस्थापित होण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असते. यासाठी त्या त्या राष्ट्राची शासन राष्ट्रातील विविध संस्था आणि सामाजिक जाणीव असणाऱ्या समाज प्रिय व्यक्ती अखंड प्रयत्नशील असतात. वर्तमान युग लोकशाहीची युग आहे. लोकशाहीत राजा राणीच्या पोटातून न येता तो मतपेटीतून येतो. स्त्री– पुरुष समानता हे लोकशाहीचे ब्रीद. त्यामुळे भारतानेही पूर्व परिचित अशी लोकशाही शासन व्यवस्थेला सुरुवात केली. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी भारतात असलेले दारिद्र्य लक्षात घेत दारिद्र्य निर्मूलनासाठी पंचवार्षिक योजनेचा प्रारंभ केला. त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा वैयक्तिक पातळीवर कर्ज व अनुदान देणाऱ्या योजना आखल्या. परंतु त्यात भारत सरकारला अपेक्षित यश आले नाही. सद्यस्थितीत २६.१० टक्के जनता दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत आहे व त्यात ५० टक्के महिलांचा समावेश आहे. भारतात महिलांची स्थान कुटुंबात दुय्यम समजले जाते. पुरुष प्रधान संस्कृती असल्यामुळे कुटुंबातील सर्व निर्णय पुरुष घेतात. देशा स्त्रियांची सामाजिक स्थिती , आर्थिक स्थिती काय ? या प्रश्नाचे उत्तर शोधताना स्त्रियांच्या साक्षरचे प्रमाण कमी, कुपोषण, आरोग्याचा अभाव, प्रति हजार पुरुषांमागे स्त्रियांचे कमी होणारे प्रमाण, हुंडाबळी, अन्याय, अत्याचार हेच निर्दशनास येते. स्त्रियांच्या विकासाकडे पंचवार्षिक योजना काळात लक्ष दिले असले तरी ग्रामीण स्त्रियांच्या सक्षमीकरणाचा खरा मार्ग स्वयंसहाय्यता बचत गटामार्फत उपलब्ध झालेला दिसतो.

**बीजशब्द :** स्वयंसहाय्यता बचत गट,महिलांचे आर्थिक –सामाजिक सबलीकरण ,बचत गटाची कार्यपद्धती

**प्रस्तावना :**

आज अनेक ठिकाणी बचत गट कार्यरत आहेत. अंगणवाडी सेविका, शिक्षक कार्यकर्ते व स्थानिक विश्वासू नेतृत्व मंडळी, दूध डेअरी चे संबंधित संचालक व सचिव अशासारखे मंडळी पुढाकार घेऊन बचत गट स्थापन करीत आहेत. खाजगीरित्या चालविणे चालविल्या जाणाऱ्या निश्चित स्वरूप देण्याचा हा पर्याय .परस्परांवर विश्वास, बचतीची सवय व आर्थिक अडचणी साठी सहाय्य, लहान उद्योगधंद्यासाठी अर्थपुरवठा यासारखी वैशिष्ट्ये बचत गटाचे ह .परस्परांना सहकार्य आणि स्वयंसहाय्य वर आधारित असा गट तयार केला जातो. शक्यता समान स्थिती व समविचारी पेक्षा साधारणत जवळपास सारखे असलेली मंडळी एकत्र येतात. राजकीय हस्तक्षेप नाही. फक्त पूर्णपणे सहभाग आणि लोकशाही तत्वावर आधारित कारभाराची रूपरेषा हाच भाग महत्त्वाचा आहे. या गटाला तसे नोंदणी करण्याची आवश्यकता आहे तिच्या रूपाने जमा होत राहिलेले पैसे बचत खात्यावर एखाद्या बँकेत ठेवले जातात गरजेनुसार व व्यवसाय धंदा साठी आवश्यक त्यांना त्यातून कर्ज दिले जाते. नियमितपणे कर्ज परतफेडीसाठी भरण्याची जबाबदारी टाकली जाते. जवळजवळ १०० टक्के रिकव्हरी असल्याची स्थिती आहे. बचत गटाचे लोक आठवड्याला व पंधरा दिवसाला एकत्र जमतात चर्चेतून निर्णय घेतले जातात. वर्किंग रजिस्टर सभासदांनी नोंद होईल बचतीचा हिशोब पासबुक तेवढे ठेवले जाते. त्यासाठीचा खर्च नाममात्र आहे. पुढाकार घेणारी व्यक्ती प्रामाणिक विश्वासू व नेतृत्व तून जनसंपर्क साधणारी असते. त्यामुळे ही पद्धती पारदर्शक असते. सहाय्यता बचत गट ही पद्धतशीरपणे गुंतागुंत नसलेली किचकट पण पद्धतशीर आखणी केलेली कार्यपद्धती आहे. स्वेच्छा , स्वयंशासन, हाच, बचत गटाचा मूलाधार होय.

**स्वयंसहाय्यता बचत गटाचा इतिहास :**

बांगलादेशात गरिबीचे उच्चाटन करण्यासाठी प्रा. डॉ. महंमद युनूस हे प्रयत्न करत होते. अर्थशास्त्राचे सिद्धांत व ग्रामीण भागातील वास्तव स्थिती यातील विसंगती जाणवू लागली. छोट्या रकमेचे कर्ज ही गरीब व्यक्तीच्या जीवनातील संघर्ष बदलू शकतो याचा अनुभव त्यांनी घेतला. त्यांनी बांबूपासून टोपल्या बनवणाऱ्या कारागिरांच्या वस्तीत दहा महिन्याच्या बचत गट स्थापन केला. मात्र त्यांना तारणाशिवाय कर्ज मिळू शकले नाही. तेव्हा प्रा. डॉ. मोहम्मद युनुस यांनी स्वत: मदत केली. तारणाशिवाय कोणती बँक कर्ज देऊ शकत नाही याची त्यांना जाणीव झाली. १९८२ मध्ये त्यांना महिलांचे बचत गट स्थापन करण्यास सुरवात केली व याच महिलांच्या सहकार्याने १९८३ साधी बांगलादेश ग्रामीण बँकेची स्थापना केली. या

बँकेतर्फे स्वयंसहाय्यता बचत गटाची कार्य सुरू झाले जगातील सर्व राष्ट्रांनी बांगलादेशाचा आदर्श घेऊन स्वयंसहायता महिला बचत गट निर्मीतीचे कार्य हाती घेतले. भारतात सहाय्यता बचत गट स्थापनेत चालना मिळाली.

डॉ. मोहम्मद युनूस यांच्या ग्रामीण बँक प्रकल्प जगप्रसिद्ध आहे. याची माहिती अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष बिल क्लिंटन यांना मिळाली त्यांनी ही चळवळ जागतिक पातळीवर नेली. त्यांनी बांगला देशातील ग्रामीण बँकेला 'गरीब बांगला महिलांच्या लघुवित्त' असे संबोधले आहे. अमेरिकन हिलरी क्लिंटन 'गुड फेत फड' लघुवित्त चालवीत होत्या. त्या प्रा. युनिस यांच्या ग्रामीण बँकेच्या कार्याने प्रेरित झाल्या. त्यांनी प्रा. युनूस यांच्या बरोबरीने लघुवित्त ही संकल्पना विकसित केली. संपूर्ण जगभर तिला मान्यता मिळाली. भारतातील स्वयंसहाय्यता बचत गट या नावाने ओळखले जाते. बांगलादेशातील ग्रामीण बँकेच्या धर्तीवर लॅटिन अमेरिका, आफ्रिका, इंडोनेशिया, मलेशिया, श्रीलंका, आखाती देश, आशियाई देश आणि ग्रामीण बँक व सुक्ष्मवित्त संस्थांची स्थापना केली आहे. प्रा महंमद युनुस प्रणित स्वयंसहाय्यता बचत गट दारिद्र्य निर्मूलन एक प्रभावी साधन आहे. महिला सबलीकरण प्रक्रियेत महिला बचत गटाचे फार मोठे योगदान आहे.

**स्वयंसहाय्यता बचत गट म्हणजे काय? :**

स्वयंसहाय्यता म्हणजे स्वत:ची मदत स्वत: करणे. स्वयंसहाय्यता गट मध्ये स्वत:चे मोदक स्वत: करणाऱ्या लोकांचा संघ किंवा संघटना होय. या गटाकडून स्वयंसहाय्यता कृती केली जाते. केवळ आर्थिक अडचणी सोडवण्यासाठी नव्हे तर सामाजिक–सांस्कृतिक कार्याचे आयोजन करण्यासाठी, त्यातील अडचणी सोडविण्यासाठी देखील केली जाते. परस्परांशी सहकार्य आणि सहभाग नेतृत्व व कर्तुत्वसह सातत्याने प्रयत्नशील व कार्यरत असणाऱ्या सदस्याच्या गटाला स्वयंसहायता गट म्हणता येईल. सहाय्यता बचत गटाची निर्मिती एकाच गावातील, वस्तीतील, मोहल्ल्यातील कमीत कमी १० व जास्तीत जास्त २० महिला एकत्र येऊन स्वयंसहाय्यता बचत गटाची स्थापना करतात. सहभागी होणाऱ्या सभासदाला सभासदत्व दिले जाते. स्वत:ची बचत राशी घेऊन येणे व गटाच्या कामासाठी वेळ देणे बंधनकारक केले जाते. सर्वांसमोर चर्चा होऊन निर्णय घेतले जातात व त्या निर्णयाचा मान ठेवला जातो. पालन केले जाते. जात, धर्म, पंथ भाषा यावरून भेदभाव केले जात नाही व आर्थिक व्यवहारांच्या नोंदी ठेवल्या जातात. हे स्वयंसहाय्यता बचत गट भिन्न भिन्न ठिकाणी वेगवेगळ्या नावाने ओळखले जातात. महिला बचत गट, स्वयंसहाय्यता बचत गट, लघु बचत गट ,सूक्ष्म कर्ज संस्था, सूक्ष्म वित्त संस्था परस्पर सहाय्यक इत्यादी लघु वित्त रुपये २५००० हजार पर्यंतचे कर्ज व ते विशिष्ट काळात जास्तीत जास्त रुपये ८०००० हजार पर्यंत वाढते.

**स्वयंसहायता बचत गटाची उद्दिष्टे :**

१. सहाय्यता बचत गटामुळे महिलाच्या संघटना तयार होऊन त्यांच्यात एकतेची भावना वाढीस लागते.

२. स्वयंसहाय्यता बचत गटामुळे महिलांना नवीन ज्ञान प्राप्त होते.

३. सहाय्यता बचत गटामुळे स्त्रियांना पोस्ट ऑफिस, बँका, शासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी जाण्याची व बोलण्याची हिम्मत प्राप्त होते.

४. स्वयंसहायता बचत गटामुळे महिलांचा सर्वांगीण विकास होते.

५. स्वयंसाहाय्यता बचत गटामुळे महिलांना नेतृत्व निर्माण होते.

६. स्वयंसहायता बचत गटामुळे महिलांच्या कलागुणांचा विकास होऊन देशाच्या विकासाला हातभार लागतो.

७. बचत गटामुळे महिलांची आर्थिक अडचण दूर होऊन होऊन समाजात मान–सन्मान प्राप्त होतो.

**स्वयंसहाय्यता बचत गटाची वैशिष्ट्ये :**

१.सूक्ष्म वित्तपुरवठा गरिबांना दैनंदिन गरजा भागवण्यासाठी नव्हे, तर गुंतवणूक, पोषक आहार घेण्यासाठी जीवनमान उंचावण्यासाठी केला जातो.

२.दारिद्र्य निर्मूलनासाठी आर्थिक प्रणाली ची उभारणी करणे म्हणजे सूक्ष्म वित्त पुरवठा.

३.सूक्ष्म वित्त व्यवस्था म्हणजे कायमस्वरूपी वित्त पुरवठा करणाऱ्या स्थानिक संस्था आहेत.

४.या व्यवस्थेतील व्याजदर मासिक २ ते ३ टक्के मासिक , वार्षिक २४ ते ३६ टक्के इतका असतो.

५.सूक्ष्म वित्त संस्था किंवा सहाय्यता गट स्वार्थाने साधर्म्य असणाऱ्या १० ते २० महिला सभासदांनी स्थापन केलेला असतो या महिला आपली बचत एकत्र करतात गरजू सभासदांना कर्ज देतात या सूक्ष्म वितांमध्ये बचत कर्ज विमा यांचा समावेश होतो.

६.या स्वयंसहाय्यता गट त्यामुळे बचतीची व काटकसरीची सवय लागते. लोकशाही प्रणालीवर आधारित असलेल्या सूक्ष्म वित्त संस्थेत सभासदत्व आहे. या सभासदांना आर्थिक व्यवहार, बँकिंग व्यवहारात संपूर्ण माहिती दिली जाते.

७. सहायता बचत गटाच्या माध्यमातून महिला सभासदांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होता येते. त्यांचा सामाजिक दर्जा

उंचावतो. त्यांना पंचायत समिती, ग्रामपंचायत सदस्य होता येत. त्यामुळे त्यांना राजकीय स्थान मिळते. त्यांची साक्षरतेचे प्रमाण वाढते. प्रामुख्याने महिलांचे सबलीकरण करण्याचे सहायता बचत गट हे एक प्रभावी साधन आहे.

**महिलांचे सबलीकरण म्हणजे काय? :**

'आत्मविश्वासा मध्ये वाढ क्षमता ,वृद्धी, सामाजिक जाणीव जागृती, कार्यक्षमता, साक्षरता, आरोग्यविषयक जाणीव, त्यांनी स्वत: आत्मसन्मानाने जगणे, आत्मनिर्भर व वित्तीय संस्था बरोबर जोडणी याच महिलांचे सबलीकरण असे म्हणतात' भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद ३९ नुसार महिलांना आपले आर्थिक धोरण राबविताना पुरुषाप्रमाणे महिलांना समान उपजीविका प्राप्त करण्याचा अधिकार दिला पाहिजे. म्हणून भारत सरकारने २०११ हे वर्ष 'राष्ट्रीय महिला सशक्तिकरण वर्षे' म्हणून साकार करण्याचा निर्णय घेतलाय. भारत हा खेड्यांचा देश आहे. २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या ७२ टक्के लोक ग्रामीण भागात वास्तव्य करीत आहेत २००१ च्या जनगणनेनुसार भारताचे एकूण साक्षरतेचे प्रमाण ६५ ३८ असूयामध्ये महिलांचे ५४ .७० टक्के आहे. यात ग्रामीण महिलांचे १५ टक्के इतकेच आहे .म्हणूनच ग्रामीण विकासामध्ये महिलांचा पाहिजे तेवढा प्रभावी सहभाग दिसत नाही. भारतातील सामाजिक चालीरीती, रूढी व परंपरा मुळे ग्रामीण महिलांना विकासाची संधी मिळाली नाही जोपर्यंत ग्रामीण महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणले जात नाही तोपर्यंत देशाचा संपूर्ण विकास झालेला आहे असे म्हणता येणार नाही.

**महिलांचे आर्थिक सबलीकरण :**

महिलांच्या आर्थिक सबलीकरणात महिलांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी, आत्मनिर्भर बनविणे अपेक्षित आहे .महिलांचे आर्थिक सबलीकरण म्हणजे महिलांना संपत्तीचा व्यापक अधिकार मिळणे, स्वयंरोजगार व उद्यमशील तिथून आर्थिक स्वावलंबन प्राप्त होणे होय. महिलांना आर्थिक उन्नती प्राप्तीच्या साधनांची उपलब्धता करून देऊन हे आर्थिक सबलीकरण साधता येते. रोजगार स्वयंरोजगाराच्या माध्यमातून महिलांना अर्थार्जनाची संधी मिळाल्यास त्या आर्थिक दृष्ट्या सक्षम होऊ शकतात. अलीकडे भारतीय महिला नोकरी व्यवसायानिमित्त बाहेर पडत असून त्या अर्थार्जन करताना दिसतात अर्थात यात उच्चशिक्षित व सदर कुटुंबातील महिलांचे प्रमाण अधिक आहे. याचा अर्थ गरीब व मध्यम वर्गातील महिलांच्या आर्थिक सबलीकरण हा प्रश्न अजूनही कायम आहे. अर्थात या दृष्टीने महिला बचत गटाची चळवळ एक प्रमुख साधन ठरते आहे.

**महिलांचे सामाजिक सबलीकरण :**

महिला सबलीकरण व सहायता बचत गट यांचा अतिशय निकटचा संबंध आहे. स्वयंसहाय्यता बचत गटामुळे महिला आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होतात. त्यांच्या अडीअडचणीच्या वेळी सर्व साहित्य बचत गटाच्या महिला परस्परांना सहकार्य करतात. स्वत:च्या आर्थिक परिस्थिती बदलण्यासाठी, स्वत:चे भांडवल उभारणीसाठी, बचत गटामार्फत कार्य केले जाते. त्यामुळे ग्रामीण व शहरी भागात सहायता बचत गट आणि जोर पकडला आहे. भारत हा खेड्यांचा देश आहे. सात लाखाहून जास्त खेडी आहेत. भारताच्या विकास करायचा असेल तर खेड्यपासून सुरुवात केली पाहिजे. स्वातंत्र्यानंतर ग्रामीण क्षेत्राचा विकास करण्याचा व महिलांचा विकास करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करूनही यश प्राप्त झाले नाही. सहाय्यता बचत गटाने महिलांना आर्थिकदृष्ट्य स्वावलंबी बनवून तिच्या क्षमता व गुणांना बदलण्यासाठी एक साधन म्हणून उपयोगी सिद्ध होऊ शकले तर त्यामुळे ग्रामीण क्षेत्रातील महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी जी कुटुंबे दारिद्रेषेखाली आहेत त्यांचे उत्पन्न वाढवून, त्याचा विकास करण्यासाठी महाराष्ट्रात महिला बचत गट निर्माण होत आहेत व अलीकडील लोकप्रिय होत आहेत. त्यामुळे महिला स्वत:च्या क्षमतेचा व स्वयंपूर्ण शोध घेण्याची ताकद निर्माण होताना होताना दिसत आहे . पैशाला पैसा जोडून पैशाची बचत करण्याचा स्त्रियांचा स्थायीभाव असल्यामुळे त्या अलीकडेच बचत गटाद्वारे भांडवल उभारीत आहे. स्वयंसहाय्यता बचत गटात एकाधिकारशाही दिसून येत नाही. त्यात अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव या पदावर स्त्रिया आळीपाळीने काम करतात . त्यामुळे त्यांच्या हेवेदावे व वैमनस्य आढळत नाही .एकत्र बसून विचार करून त्या निर्णय घेतात व बचत येऊन दुसर्यांना कर्ज देऊन आपली संघटन शक्ती उभी करत आहे. बचत गटातील महिलांच्या वाढत्या क्षमतेमुळे नाबार्ड द्वारे स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेद्वारे महिला आर्थिक विकास मंडळ द्वारे जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत महिला विकासाला गती प्राप्त होत आहे. अलीकडे स्वयंसहायता बचत गटात कार्य करणाऱ्या स्त्रियांचे महाराष्ट्रात जवळपास एक लाख ६१ हजार ६७२ स्वयंसहाय्यता बचत गट निर्माण झाले आहेत व त्यांना बरेच अनुदान प्राप्त झाले आहे. मिरची पावडर, लोणचे, औषधी वनस्पतीची लागवड, मेणबत्ती, फिनाल, शरबत, मसाला, चिवडा शेळीपालन, कुक्कुटपालन, शेव ,लाडू इत्यादी व्यवसाय करताना दिसतात. महिलांना त्यामुळे ग्रामीण क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्था त्यांचे प्रभाव निर्माण होत आहेत. सर्व

स्वयंसहायता महिला बचत गट चळवळीचा उद्देश चांगला असून त्यांचा प्रचार व प्रसार आणि परिणामही चांगला आहे .त्यामुळे बरेच फायदे झालेले आहेत म्हणूनच महिलाच बरेच पुढील प्रमाणे आर्थिक व सामाजिक बदल घडून आलेले आहेत.

१. स्वयंसहाय्यता बचत गटामुळे महिलांना बचत गटातील व्याज रकमेत भागीदारी मिळत आहे.

२. बचत गटातील भागीदारीमुळे बँका व शासकीय कार्यालयातील कामे तेसुद्धा करू लागलेत .पूर्वीप्रमाणे आता घाबरत नाही.

३. बँका व अधिकोषना महिलांचे रूपात प्रामाणिक विश्वासू ग्राहक प्राप्त होत आहे.

४. महिला असलेल्या कलागुणांना महत्त्व प्राप्त होत असून त्यांचा त्या प्रभावीपणे उपयोग करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

५. स्वयंसहाय्यता बचत गटामुळे महिलांच्या नावावर बँकात मालमत्ता जमा होऊ लागले आहेत.

६. स्वयंसहाय्यता बचत गटामुळे महिला स्थानिक राजकीय नेतृत्व निर्माण होत आहे .

७. ग्रामीण महिलांचे जीवनमान बदल होऊ लागले आहेत.

८. स्वयंसहायता बचत गटामुळे आजारपण, विवाह, शिक्षण कार्यात मदत मिळते .

**भारतातील स्वयंसहायता बचत गटाची स्थापना व स्थितीचा आढावा :**

भारतात सर्वप्रथम बचत गटाची सुरुवात 'मैसूर रीसेटलमेंट अँड डेव्हलपमेंट एजन्सी' मायराडा" या संस्थेने केली. त्यांनी बचत गटाची 'क्रेडिट मॅनेजमेंट ग्रुप 'निर्माण केले. मायराडा माध्यमातून सर्व बचत गटांची निर्मिती होत असताना १९८० च्या दशकात बचत गटाचे माडेल स्वीकारून ग्रामीण भागात याचे प्रयोग भारतात सुरू केले. १९९१– ९२ पासून बचत गटांना क्षेत्रात लघुवित्त कायदेशीर मान्यता देऊन बचतगटांच्या चळवळीला जोमाने सुरुवात केली. तसेच ४ जानेवारी रोजी रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार ग्रामीण बँकेचे भारतातील सर्व बँकांना बचत गटाच्या नावावर बँकेत बचत खाते सुरू करण्याचे आदेश दिले. त्यानुसार भारतात महिला सक्षमीकरणाच्या कार्यात राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक, नाबार्ड, महिला आर्थिक विकास महामंडळ या राष्ट्रीय प्रादेशिक संस्थांबरोबरच 'चैतन्य वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट ,इत्यादी बिगर शासकीय संस्था देखील बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाच्या योजना यशस्वीपणे राबवित आहे.

**बचत गटाची कार्यपद्धती :**

१. बचत गट स्थापन करून बचत म्हणून पैसे गोळा करणे आणि त्यातून कर्ज देणे हा मुख्य उद्देश साध्य केला जातो. त्याची कामकाजाची पद्धती सर्वसाधारणपणे सोपी आहे. सेव्हिंग खात्यावर पैसे ठेवण्यासाठी बँकेमध्ये बचत गटाला खाते काढावे लागते. क्रेडीट मिळावे म्हणून डिपॉझिट ठेवणे जरुरीचे केले आहे. रिझर्व बँकेने हे ४ जानेवारी १९९३ च्या परिपत्रकाद्वारे तसे बँकांना कळविले आहे

२. कामकाजाच्या पद्धतीसाठी मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत. बचत गटाने सेव्हिंग खात्यावर जमा केलेले पैसे ठेव म्हणून ठेवायचे आणि बँक आत्ता ठेवीच्या प्रमाणात कर्ज देतात. त्याप्रमाणे १:१ पासून ते १:४ पर्यंत असू शकतो. त्याबद्दल निर्णय घेण्यात धोरणात्मक लवचिकता असून प्रमाणाची निश्चिती करण्याचा अधिकार ज्या त्या बँकांना देण्यात आला आहे.

३. बचत गट हा लिंकेज प्रोजेक्ट आहे. तसे नाबार्डने ठरवले असून री–फायनान्स सुविधा दिलेली आहे. पुनर्वित्त आधार या दृष्टीने बचत गटांना बँक वित्त पुरवठा करते आणि बँकांना नाबार्ड पुरते त्या वित्तपुरवठा त्यावरील व्याज दर ६.५ टक्के आहे, तर बचत गट सभासदांना बारा टक्क्यांनी कर्ज दिले जाते संस्था स्थापन करतात अशा गटात येतात व त्यांचे मार्फत बचत गट सभासदांना कर्ज देताना १२ टक्के कर्ज दिले जाते. व्याजदर कमी करण्याची आवश्यकता आहे तो कमी करण्याचे प्रयत्न नाबार्ड संबंधित बँका संशोधन संस्था आणि या कामात पुढाकार घेतलेले स्थानिक कार्यकर्ते मंडळी यांच्याकडून व्हायला हवा .कारण सर्वसामान्यांसाठी कल्याणाच्या हेतुने व उत्पन्न हळूहळू अल्प प्रमाणात वाढ व्हावी हाच उद्देश त्यामागे आहे. गरीब गरजू अल्पभूधारक, शेतकरी, भूमिहीन शेतमजूर व कारागीर काम करणारी मंडळी यांच्या साठी बचत गट मेळावा म्हणून बँकांनी अजूनही व्याजदर कमी करणे उचित आहे.

**बचत गटाचे आर्थिक व सामाजिक परिणाम :**

गेल्या १० ते १५ वर्षापासून बचत गट कार्यरत आहेत त्यांची संख्याही वाढत आहे. त्या कार्याशी निगडित आहे म्हणून जाणवलेले परिणाम असे की

१. महिलां बचतीची सवय लागते.

२. काटकसर करून पैसे वेळेवर द्यायची वडण लागते .

३. बँक व्यवहार व हिशोब माहिती झाली आणि जाणीव जागृती वाढली व सावधानता वाढली.

४. महिला या निमित्ताने प्रत्यक्ष पैसा साठवून स्वत: व्यवहार करू लागल्याने आत्मविश्वास वाढला. त्यांचे प्रतिसादाचे प्रमाण वाढले.

५. सामाजिक मान्यता मिळाल्याने व अशा निमित्ताने घराबाहेर पडणे यातून प्रबोधनाची व परिवर्तनाची मनोवृत्ती विकसित झाली त्या यादीत बनल्या बोलू लागल्या.
६. रोजगाराची संधी वाढली बचत गटाच्या साह्याने ग्रामीण भागात रोजगार वाढ झाली.
७. आर्थिक बाबी केव्हा उलटली याबाबत बचत गटाचे कामामुळे आर्थिक अडचणी सोडवणे शक्य झाल्यामुळे बचत गट ही उपयुक्त ठरते ही जाणीव झाली.
८. महिलांचे सार्वजनिक व सामाजिक कार्यात सहभागी होण्याचे प्रमाण बचत गट निश्चितपणे वाढले. महिला संघटित होऊन देशी दारू विक्री बंद करण्याच्या मोहिमेत यशस्वी होत आहेत .सर्व महिला बचत गट चळवळीचा उद्देश चांगला आहे, योजना चांगली आहे, प्रचार–प्रसार व परिणाम चांगला आहे. अल्पावधीत लोक भूमी पावलेली व मान्यता पावली संकल्पना आहे

**स्वयंसहायता बचत गटाचे फायदे :**

अशा या चळवळीचे फायदे पुढीलप्रमाणे दिसतात
१. महिलांनी बचत केलेल्या रकमेपेक्षा दहापट रक्कम वापरावयास मिळते.
२. बचत गटाला मिळालेल्या व्याजात महिलांनी भागीदारी मिळते.
३. बचतगटामुळे महिला शासनाच्या कार्यालयात जाण्याचा घाबरत नाही.
४. बचतगटामुळे महिलांचे नेतृत्व तयार झाले .आहे
५. बँकांना विश्वासू, प्रामाणिक ग्राहक मिळाले आहेत.
६. महिलांच्या कलागुणांना वाव मिळत आहे .
७. महिला बचत गट त्यामुळे महिलांच्या नावावर मालमत्ता रक्कम जमा होऊ लागले आहे.

**स्वयंसहायता बचत गटाचे तोटे :**

१. एकच महिला अनेक बचत गटाचे सभासद असलेली दिसून येते.
२. महिला बचत गटांना दिलेल्या स्वतंत्र व्याजदराच्या अल्प प्रमाणामुळे सामुदायिक सावकारीचा उदय झालेला आहे.
३. महिला बचत गट चळवळीमध्ये राजकीय हस्तक्षेप असलेला दिसून येतो गावातील राजकीय नेते महिला बचत गटाला राजकारणासाठी उपयोग करून घेता हे सामाजिक बांधिलकी दबाव दिसून येत आहे.
४. बचत गटाचे यश महिलांच्या सक्रियतेवर अवलंबून आहे. परंतु बऱ्याच बचत गटांची वाटचाली बँकाकडून कर्ज उचल करे पर्यंत ती दिसून येते .त्या पलीकडे काय असा प्रश्न उपस्थित होत आहे.
५. महिला बचत गटाची संख्यात्मक वाढ झाली असली तरी गुणात्मक वाढ झाल्याचे दिसून येत नाही.
६. बँकांच्या थकबाकी मध्ये वाढ होत असल्यामुळे बँकांमध्ये उदासीनता दिसून येते.
७. महिला बचत गटांनी तयार केलेल्या मालाची स्पर्धा करू शकत नाही.

वरील तोट्यामुळे चळवळ पाहिजे त्या प्रमाणात यशस्वी झाल्याचे दिसून येत नाही. तर यशस्वी होण्यासाठी सुद्धा महत्वाची आहेत.

**शिफारशी :**

१. देशातील महाराष्ट्रातील अनेक संस्था व कार्यकर्ते आपापल्या परीने महिला विकासाचे माध्यम म्हणून महिला बचत गटांना वापरीत आहे समन्वयाचा अभाव दिसून येतो. केंद्रीय पद्धतीने मूल्यमापन झाले पाहिजे.
२. सासुबाई –सुनबाई यांचे एकत्रित आनंद मिळावे व्हायला पाहिजेत कारण आजही सासुबाई कडून सूनबाईला किंवा सुनेकडून सासूबाईला महिला बचत गट कार्यात सक्रिय व्हायला कौटुंबिक अडथळे येत आहेत.
३. दारिद्र रेषेखालील यादी ही सदोष असली पाहिजे असलेल्या बऱ्याच महिला त्याच्या चळवळीचा विकास कार्य पासून वंचित आहेत.
४. शासनाने त्या चळवळीतील सर्वस्वी संकल्पना कार्यक्षमता वाढविल्या पाहिजेत शासनाने महिला बचत गटाचे बाबतीत बँकांची असलेली उदासीनता कमी केली पाहिजे कारण या चळवळीतील बँक हा केंद्रबिंदू आहे.
५. शासनाला महिला बचत गटाची व्यवस्थापन करण्यासाठी अर्थ साहाय्य देण्यासाठी, कार्य प्रमाण करण्यासाठी, महिला बचत गटाच्या माहितीचे संकलन केंद्र पद्धतीने केले पाहिजे.

**निष्कर्ष :**

आपल्याला कुटुंबासाठी, काही अर्थार्जन करून रोजगार कसा करता येईल इतकेच मर्यादित विचारांचे जरी आपण महिला बचत गट यशस्वी कर चालू शकलो तरी सुद्धा या स्पर्धेच्या परिस्थितीत महिलांच्या सबलीकरणासाठी ,आर्थिक विकासासाठी मोठीच मदत करणार आहे. बचत गट दुर्बलांना सबळ करण्याचे सामर्थ्य कोण आहे. तेव्हा भारतीय संस्कृतीने व समाजाने दुर्बल ठरवलेल्या महिलांच्या सबलीकरणासाठी बचत गट चळवळ संजीवनी शक्तीचे काम करू शकते ही गोष्ट आपण जाणून घेतली पाहिजे. म्हणून महिलांनी आत्मविश्वासाने मोठ्या प्रमाणावर बचत गटात सहभागी होऊन निरनिराळ्या, बचत गटाची निर्मिती करून स्वत:चे सबलीकरण करून घेतले पाहिजे.

''आभाळाएवढी ज्यांची उंची

त्यांनी थोडे खाली यावे
त्यांना थोडे उचलून घ्यावे.''

**संदर्भ :**

अर्थमंथन (मराठी अर्थशास्त्र परिषद, नोव्हेंबर. २०१०)

अर्थसंवाद डिसेंबर. २००४

युग निर्माण योजना, नोव्हेंबर २००२

बचत गटासाठी स्वयंरोजगाराचे ५१ महामार्ग – एस बी पवार

शुभम बहुउद्देशीय मार्गदर्शन संस्था, पुणे २००९

स्वयंसहाय्यता समूह के माध्यम से मायक्रो फायनान्स – डॉ. ओमप्रकाश रिगल पब्लिकेशन न्यू दिल्ली २०१०

स्वयंसहायता बचत गट गरीब की बँक – .टी एस. जाधव कीर्ती बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, लातूर २००८